
Samachar Patrika RNI 16775/1967 Regd. No. MCW-126/2024-26, Published on 15th of every month



# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार



वर्ष ५८ वे, अंक १०वा, मुंबई । डिसेंबर २०२५
एकूण पाने २० । प्रती अंक ₹ ५ । वार्षिक वर्गणी ₹ ५०

Year : 58, Issue : 10, Mumbai I December 2025
Total Pages 20 I Price per Issue ₹ 5 I Yearly Subscription ₹ 50






## विजय पताका श्रीरामाची झळकते अंबरी प्रभू आले मंदिरी

# कोल्हापूर देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघाची परिचय बैठक







देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण

**समाचार**

वर्ष ५८वे, अंक १०वा,
डिसेंबर २०२५
(फक्त सभासदांसाठी)

**श्री. महेंद्र गंधे**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. विनोद मांडके**
कोषाध्यक्ष

**श्री. मिलिंद सरदेशमुख**
कार्यवाह

**संपादक**
**श्री. मिलिंद सरदेशमुख**
मो. : ९८६७९९४३८९

अंकातील मजकूराशी मंडळ सहमत असेलच असे नाही

भ्रमणध्वनी :
८४१९९०१०८७, ८४१९९०१०८८
ई–मेल : aadrbm@gmail.com
संकेतस्थळ : www.adrbmmahim.in



Hurda party
at
MF
क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत।
MELGIRI FARMS
First Time in Hyderabad Where You Can Roast & Eat HURDA Directly at Farm
From 15 Nov 2025 to 15 Feb 2026
Morning 10:00 to Evening 05:00
One Day Advance Pre - Booking is Mandatory
Call: 70137 78442 | 9392495268
Lunch | Hi-Tea | Farm Visit | Bullock cart Ride | Tractor Ride
Play Area for Children | Toy Train | Swings and Many More, Pluck your own
Vegetables live with our farmers help all in one visit at MELGIRI FARMS.
Farms: S.No. 66, 67, 75 & 76A, Yenkepalli, Bakaram Road, Moindabad Mandal, R.R. Dist, Telangana - 500075
R.O. For Correspondence: 3-4-22, Venkatesh Bhuvan, Dr. Bhoomanna Lane, Kachiguda, Hyderabad 500027
/Melgiri Farms

# अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

अद्यावत नूतनीकरण केलेली
सर्व सोयींनी उपलब्ध अशी दादा - माहीम विभागातील

## खालील मंगल कार्यालये

- तळमजल्यावरील कै. राधाबाई कब्बूर वातानुकूलीत सर्व अद्यावत सोयीयुक्त सभागृह
- दुसऱ्या मजल्यावरील अद्यावत सोयीयुक्त सभागृह.

## * वैशिष्ट्ये *

वधू-वरांसाठी प्रशस्त खोल्या, स्वयंपाकासाठी प्रशस्त किचन
मंगल कार्य ठरतात प्रथम खालील ठिकाणी चौकशी करून
कार्यालय राखून ठेवा.
सोसायटीच्या सभा, संगीताचे कार्यक्रम, चर्चासत्रे, परिसंवाद,
नाट्य-तालीम,
संमेलन ह्यासाठी पण उपलब्ध

****

## अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहीम, मुंबई - ४०० ०१६.
दूरध्वनी : २४३०२२७३/२४३०७५७६ Email : aadram@gmail.com

# संपादकीय

डिजिटल फसवणूक- ज्येष्ठानो स्वत:ला सांभाळा डिजिटल फसवणुकीच्या बातम्या हल्ली दररोज वर्तमानपत्रात आपण वाचत आहोत. आजच ठाण्यात राहणाऱ्या ६४ वर्षाच्या एका ज्येष्ठ व्यक्तीला फोन करून पोलीस अधिकारी असल्याचे भासवून नाशिकमध्ये तुमच्या नावाने बँकेत उघडलेल्या खात्यात मोठया प्रमाणावर अवैध पैशाचे व्यवहार चालू आहेत तसेच दहशतवादी संघटनांच्या संबंधित लोकांशी आपले आर्थिक व्यवहार झाले आहेत याप्रकरणी राष्ट्रीय सुरक्षा कायदा अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आल्याची खोटी बतावणी केली आणि सहकार्य न केल्यास तुम्हाला अटक करण्यात येईल अशी धमकी देण्यात आली. फोनवरील व्यक्ती पोलीस अधिकाऱ्याच्या वेशात होती त्याने ज्येष्ठाकडून गुंतवणूक विषयी माहिती विचारत सेबी, आरबीआयचे खोटे पत्र पाठवत आहोत या परिपत्रकाचा भंग केल्याचे सांगितले आहे अशा वेगवेगळया कारणांखाली ज्येष्ठाकडून एक कोटी पंचवीस लाख रूपये ऑनलाईन मागितले. नौपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ७८ वर्षाच्या ज्येष्ठ नागरिकाला एक कोटी सहा हजाराचा ऑनलाइन गंडा घातल्याचे उघडकिस आले आहे. अशाच प्रकारची एक तक्रार ठाण्यातील एका ज्येष्ठाने राबोडी पोलिस ठाण्यात केली आहे. ठेवीवर ज्यादा व्याजदर देतो, शेअर बाजारातील गुंतवणुकीसाठी देखी प्रलोभने दाखवली जातात. अनेक लोक प्रलोभनाला बळी पडत आहेत आपली आयुष्यभर साठवलेली गुंतवणूक अशा प्रकारे सायबर चोराच्या हाती दिली जात आहे. आज काल बरेचसे व्यवहार ऑनलाइन झाले आहेत, धोका देखील वाढला आहे. प्रलोभनाला बळी पडून कोणालाही ओटीपी अथवा पासवर्ड शेअर करू नका, देऊ नका, शंका असलेल्या लिंकवर क्लिक करणे टाळा, संशयास्पद वाटले तर लगेच तक्रार करा, ऑनलाइन व्यवहार करताना आपण माहिती व काळजी घेतली तर त्यापासून आपण सुरक्षित राहू शकतो असे व्यवहार टाळू शकतो. अनोळखी फाइल्स, ॲप्स डाऊनलोड करू नका. अशा फसवणुकीच्या प्रसंगाला सामोरे जावे लागले तर Cybercrime.gov.in वर ऑनलाईन तक्रार दाखल करता येते.

**– मिलिंद मल्हारराव सरदेशमुख**

## कृतज्ञता देणगी

श्रीनीलकंठेश्वर देवस्थान पूजा अर्चा भेडसगाव ट्रस्ट यांनी अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या विविध उपक्रमांसाठी रु. २०,०००/- ची देणगी दि. १२ नोव्हेंबर २०२५ रोजी दिली आहे, मध्यवर्ती मंडळातर्फे त्यांचे आभार.

## नम्र सूचना

सर्व मान्यवर सभासद बधूं - भगिनींना कळविण्यात येते की, संस्थेचा दुरध्वनी क्र. २४३०२२७३ / २४३०७५७३ या सेवा खंडित झाल्यामुळे सपर्क करणे अवघड झाले होते त्याकारणे मध्यवर्ती संस्थेने ८४१९९०१०८७ व ८४१९९०१०८८ हे भ्रमणध्वनी (मोबाईल) सुरू करण्यात आले आहेत. सभासदानी यांची नोंद घ्यावी आणि (कार्यालयीन वेळ:- सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.००) या वेळेत वरील दोन्ही भ्रमणध्वनीवर संपर्क करावे.

# समर्थांची पावन भिक्षा व तिचे महत्त्व

**स.भ. मोहनबुवा रामदासी (मो. : ९१४६८५५६९१)**

समर्थांची 'पावन भिक्षा' ही एक प्रार्थना आहे, ज्यामध्ये समर्थ रामदासांनी देवाकडे मागितलेल्या आध्यात्मिक गोष्टींचा उल्लेख आहे. यात अभेद्य भक्ती, आत्म-निवेदन, तद्रूपता, अर्थारोहण आणि सज्जन संगती यांसारख्या गोष्टी मागितल्या आहेत. हे मागणे म्हणजे केवळ भौतिक गोष्टींऐवजी आध्यात्मिक उन्नती आणि परमार्थ साधण्याचे सामर्थ्य मिळावे, हीच त्यांची इच्छा आहे. समर्थ रामदास स्वामींच्या पावन परंपरेत 'भिक्षा' ही केवळ अन्न-वस्त्रांची याचना नाही, तर साधकाला अंतरंगशुद्धी, सद्गुणांची वृद्धी आणि प्रभू श्रीरामाशी अधिक आध्यात्मिक निकटता प्राप्त करून देणारी साधना आहे. समर्थांनी प्रभूंकडे कधीच भौतिक सुखांची विनंती केली नाही. त्यांनी मागितले ते कोमलवृत्ती, निर्मल बुद्धी, भयमुक्तता, श्रद्धा, करुणा, संयम आणि सदैव रामस्मरणात स्थिर राहण्याची कृपा. हीच 'पावन भिक्षा'. यामुळे साधक स्वतःची परीक्षा घेतो, गुण-अवगुण तपासतो आणि साधनेत दृढ होतो. म्हणूनच भिक्षा या शब्दाचे अध्यात्मिक महत्त्व अत्यंत उंच आहे.

या पावन परंपरेचा अर्थ 'भीख' या शब्दापेक्षा पूर्णपणे वेगळा आहे. भीख हतबलतेतून येते; ती व्यक्तीला निर्बल करते. पण भिक्षा ही धर्मासाठी, सेवेसाठी, संस्कारासाठी आणि समाजकार्यासाठी देण्यात येते. ती आळस वाढवणारी नाही; उलट साधकाला संयमी, नम्र आणि सेवाभावी बनवणारी आहे. समर्थांनी भिक्षेला समाजोद्धाराचे साधन केले, आणि रामदासी परंपरेत भिक्षा ही जबाबदारी बनली-कर्तव्यभावनेतून, विनम्रतेतून आणि धर्मकार्यासाठी. या परंपरेचा आत्मा जपणारा श्रीक्षेत्र खातगाव, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर येथे वसलेला आनंदी-नारायण कृपा न्यासाचा, समर्थ रामदास स्वामी मठ आज अनेक सामाजिक, आध्यात्मिक आणि आरोग्यविषयक उपक्रमांद्वारे सर्वसामान्यांसाठी सतत कार्यरत आहे. समर्थांनी दिलेल्या शिस्तीप्रमाणे, सेवाभाव, भक्ती, संस्कार आणि सात्त्विकता हेच मठाचे आधारस्तंभ आहेत. अनेक भक्तांनी दिलेल्या प्रेमळ भिक्षेमुळे मठात विविध उपक्रम निर्विघ्न सुरू आहेत. गोशाळा व गोपालन ही परंपरा समर्थांच्या 'दया' आणि 'सेवा' या विचारांचे जिवंत दर्शन घडवते. मठामध्ये येणाऱ्या प्रत्येक भाविकासाठी निवास आणि साधेसुधे सात्त्विक भोजन प्रसादाची व्यवस्था आहे. येथे देण्यात येणारा प्रसाद हा फक्त अन्न नसून भक्तांच्या भावनांचे आणि समर्थांच्या कृपेचे प्रतीक आहे. आरोग्यसेवेचाही इथे विशेष उपक्रम आहे-भक्त, ग्रामस्थ आणि गरजू लोकांसाठी आरोग्यसहाय्याची भावना जपली जाते. मठ परिसरातील शांत वातावरण, सात्त्विकता आणि सेवा भाव हे मनाला स्थिरता देतात. मठात देशी गाईंचे संगोपनही अत्यंत प्रेमाने केले जाते. गोशाळा ही समर्थ परंपरेतील दया, करुणा आणि संरक्षण भावनेची साक्ष आहे. गाईंच्या सेवेमुळे सात्त्विकता, शुद्धता आणि पर्यावरणपूरक जीवनपद्धतीचा संदेश सर्वांना मिळतो. आगामी काळात मठामार्फत वेदपाठशाळा सुरू करण्याचा शुभ मानस व्यक्त करण्यात आला आहे. वेद, संस्कृती आणि भारतीय अध्यात्म यांचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवण्याचा हा प्रयत्न अत्यंत महत्त्वाचा आहे. अशा सर्व उपक्रमांसाठी भक्तांचे सहकार्य हे नेहमीच प्रेरणादायी आणि आवश्यक आहे. समर्थ परंपरेतील भिक्षा म्हणजे फक्त देणगी नव्हे; ती धर्मरक्षणाच्या कार्यात सहभागी होण्याची पवित्र संधी आहे. ज्यांच्या अंतःकरणात सेवा, भक्ती आणि धर्मकार्यासाठी हातभार लावण्याची भावना आहे, अशा सर्वांनी या पवित्र प्रयत्नात सहभागी व्हावे, ही मठाची विनम्र विनंती. समर्थांच्या पावन भिक्षेच्या भावनेतून होणाऱ्या प्रत्येक सहभागात प्रभू श्रीरामाचीच कृपा असते-शांत, पवित्र आणि मनाला उन्नत करणारी.

# स्व अस्तित्वाचे भय

**संगीता कुलकर्णी** (मो. : ९८७०४५१०२०)

स्व-अस्तित्व म्हणजे नेमके काय तर परिस्थितीनुसार जडणघडण अनुभव घेऊन जपलेले स्वतःचे व्यक्तिमत्त्व...जे आपल्याला स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव करून देते.. प्रत्येकाची जीवन जगण्याची व्याख्या वेगळी असते पण जीवनामध्ये चालण्याचा मार्ग हा कधीच सरळ नसतो तर कधी कधी तो वळणावळणाचा असतो... त्यामुळे चालताना कधी सुख येते तर दुःख येते तर कधी वादळे संकटे येतात...या सर्व गोष्टींबरोबर आपल्या सोबत एक गोष्ट कायम असते ती म्हणजे भय, भीती ...! नेहमीच जी आपल्याला कोणतीही कृती करण्याअगोदर वाटत असते... खरं तर भय आपल्यात निर्माण होण्याची सुरुवात ही गर्भात असल्यापासूनच होते.. आपण संसारात आजूबाजूला अनेक गोष्टी पाहत असतो.. अनुभवत असतो आणि हे अनुभव घेत असतानाच भितीदायक असे काही प्रसंग घडत असतात.. अश्या वेळी भय निर्माण होते.. नंतरही मोठे होत असताना कसले ना कसले भय वाटतच राहते.. कधी पाण्याचे भय, कधी अभ्यासाचे भय, कधी उंचावरून पडण्याचे भय तर कधी रस्त्यावरून चालताना पडण्याचे भय जर कधी कोण मोठ्याने ओरडले तर त्या व्यक्तीचे ही भय वाटायला लागते..! थोडेफार स्व अस्तित्वाचे भय प्रत्येकाला असणे देखोल जरूरीचे आहे .. या भयामुळेच कधी कधी उत्क्रांती घडून आलेली आपण इतिहासात वाचलीच आहे..! आपले अस्तित्व टिकून रहावे यासाठी निर्माण केलेले स्वराज्य चांगले रहावे यासाठी शिवाजी महाराजांपासून संभाजी राजे व पुढे पेशवे ही अविरत झटत राहिले... हे स्व -अस्तित्वाचे भयच तर होते जे त्यांना क्रांती घडविण्यासाठी उद्युक्त करत होते.. हेच भय पुढे आपल्या थोर क्रांतिकारकांनी देशाला

JV MARKETING & INVESTMENTS
*Premium Residential & Corporate Real Estate Advisor*

*Sales And Marketing Of New Projects*
*Pre-leased Commercial & Retail Options*
*Business & Home Loan Assistance*

*Rahul V. Deshpande* — *+91 98330 25031*
*MBA - Marketing* — *jvmarketinginvestments@gmail.com*

*Samarth Raghukul, Gokhale Road South, Dadar West, Mumbai - 400 028*
*MahaRERA ID - A51900028785* *@jvmarketing18* *jvmarketing18*

**For enquiries and bookings in new projects across Mumbai, Thane and Navi Mumbai, kindly contact Rahul V. Deshpande - 98330 25031**

स्वातंत्र्य मिळावे ह्यासाठीच वापरले.. इतकेच नाही तर स्त्रियाही स्व–अस्तित्वाचे भय दाखवू लागल्या.. राणी लक्ष्मीबाई इंग्रजांच्या विरोधात लढल्या तर राणी पद्मिनीला जोहार करण्यास भाग पाडले...हे स्व– अस्तित्वाचे भय होतेच म्हणून ना..!स्व'चा शोध घेणं ही माणसाची मूळ प्रेरणा राहिली आहे... 'स्व'चा शोध घेताना... जगणं अर्थपूर्ण व्हावं म्हणून हा 'स्व'च्या अवकाशाचा अथक शोध स्वतःच असं काही सापडवण्याची आस... खिडकीमधून तो तुकडा दिसेल तेवढा आणि तितकाच आहे, हे वास्तव आहे .. मातीचा वास येणाऱ्या आतल्या काळोखात स्वतःलाच भेटण्याची एखादी जागा, जिथं स्वतःला पेरणं आहे आणि पुन्हा उगवून येण्याची वाट पाहणं आहे. बाहेरच्या बेगडी जगात वावरताना स्वतःला सिद्ध करू पाहणं..! संध्यासमय हा संधिकाल असतो एक परिस्थिति संपून दुसरी सुरु होण्याचा व एक मनःस्थिति पालटून दुसरीच्या प्रारम्भाचा...! आणि अशावेळी मनात एकच गोष्ट वारंवार येते ते म्हणजे भय इथले संपत नाही...! व्यावहारिक जीवनात आधार नसला की भय वाटते.. पारमार्थिक दृष्टिने द्वितीयाद्वै भयं भवति या औपनिषद उक्तिनुसार जोवर द्वैत आहे तोवर भय असते अद्वैत अभय आहे...! जगाच्या संपूर्ण व्यापामध्ये कोणी किती वरकरणीचे आधार शोधले किंवा स्वतःच्या कर्तृत्वाने परिस्थितीला तोंड द्यायचं म्हटलं तरी ते सगळे उपाय तात्पुरते असतात.. मनाला सतत भेडसावत राहणारी भीतिची एक भावना कधीच सरत नाही.. या वस्तुस्थितिच्या जाणीवेतून स्व अस्तित्वाचे भय संपत नाही.. विश्वातील प्रत्येक जीवाला भय आहे. कारणवस्तू निश्चित वेगळी असू शकते पण भाव एकच असतो तो भयाचा.. मृत्यूचे भय,आपल्या स्व–अस्तित्वहीन होण्याचे भय, आपल्या जमवलेल्या संपतीच्या ऱ्हासाचे भय., आपल्या प्रियजन व्यक्तीशी होणारी संभाव्य ताटातूटीचे भय, आपल्या संचित पापाचे भय, आपल्या मर्यादेबाहेरील निसर्गाचे भय... भय हे सर्वत्र व्यापले आहे. सर्वांना क्षणिक मुक्ती हवी असते ती भयापासून...! भयापासून मुक्ती कशी मिळेल? निर्भय होऊन? पण निर्भय होणे एवढे सोपे आहे का? क्षणभूंगूर अश्या जीवनाच्या स्व अस्तित्वाचाच जेथे प्रश्न आहे तेथे निर्भय कसे व्हावे? निर्भय होता येते? जर अभय मिळाले तर... भयापेक्षा ही जास्त शक्ती अभय मध्ये आहे. शक्तिशाली जीवाने जर शक्तिहीन जीवाला अभय दिले तर तो भय मुक्त होऊ शकतो पण शक्तिशाली कुठल्या कारणाने अभय देईल? जर शक्तिशाली जीव जर सर्वांना समभाव नजरेने पाहत असेल आणि त्याच्या मनात करुणाभाव असेल तर हे सहज शक्य आहे...! आपल्याला भय का वाटत राहते ह्याचे कारण शोधायला गेलो तर बरीच उदाहरणे सापडतील.. आजचे युग हे स्पर्धेचे, उत्क्रांतीचे युग आहे.. यांत्रिकीकरण वाढले आहे तसेच नवनवीन शोध ही लागत आहेत... या स्पर्धात्मक युगात आपण घेतलेले निर्णय चुकीचा नाही ना? अपयश तर येणार नाही ना? व्यवस्थापन तर चुकणार नाही ना? असे एक ना अनेक प्रश्न मनात येतात आणि नंतर त्याचे रूपांतर भयामध्ये परावर्तीत होते... तसेच कुटुंबातील वातावरण देखील कारणीभूत ठरते... कुटुंबात प्रेम, जिव्हाळा, संवाद नसणे, आत्मविश्वासाची कमतरता, एखादी गोष्ट आपल्या हातातून निसटून गेली तर अशी एक ना अनेक कारणांनी भीती मनात दाटू लागते, चिंता व काळजी मागे लागते मग मनाचे खच्चीकरण होते... प्रत्येकालाच आपल्या अस्तित्वाचे भान ठेवणे आवश्यक आहे.. हे जरी खरे असले तरी आपण हे भान बाळगत नाही त्यामुळे आपले नुकसान ही होते... साध्या साध्या गोष्टींकडे, कृतींकडे जर लक्ष दिले तर हा मुद्दा लक्षात येईल पण ते न बाळगल्यास भय निर्माण होऊन आपलेच नुकसानच होते.. भान ठेवून कोणतीही गोष्ट केली तर मनातील भीती नाहीशी होऊन आपण उत्तम प्रगती साधू शकतो हे नक्कीच..! स्वःताला ओळखता आले तर स्व अस्तित्व जपता येते...! आपले मन हे एक अजीब रासायन आहे... आपण नेहमीच आपल्या मनाप्रमाणे वागत बोलत असतो.. स्व –अस्तित्वाचे भय आपल्या मनामध्येच असते ..त्यामुळे भय देखील मनामध्येच दडून राहिलेले असते... भीती ती तर जगाच्या कोणत्याही कोपऱ्यातील माणसाच्या मनात असते. कशाची भीती हे तपशील वेगवेगळे असले तरी भीतीची प्रत्यक्ष भावना ही कोणत्याही मानवात सारखीच असते मनातले भय नाहिसे करण्यासाठी आत्मविश्वास निर्माण करणे आवश्यक असते.. प्रसन्न

वातावरणात, निसर्गाच्या सान्निध्यात, चांगल्या व विचारी माणसांच्या सहवासात राहिल्यास मनाला उभारी तर मिळतेच व मन प्रसन्न ही राहते.. पण जेव्हा स्व–अस्तित्वाचे भय निर्माण होते तेव्हा मात्र मानसिक स्थिती बिघडते व कोणतीही गोष्ट करताना वा करण्यासाठी मन धजावत नाही ते घाबरते.. अश्या वेळी एक मन पुढे जाण्यासाठी प्रोत्साहित करत असते तर दुसरे मन भयाने भारलेले असल्याने बुद्धी भ्रष्ट करण्याचा प्रयत्न करते... अश्या वेळीस मात्र आपण आपल्या अंर्तःमनाचा आवाज ऐकला पाहिजे. भय हे कधीच पूर्णपणे नाहिसे होणारे नसते.. मनाचा अभ्यास करून समुपदेशन करून त्यातून त्याला बाहेर काढावे लागते.. स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव झाली की स्व अस्तित्वाचे भय कमी होते.. मन प्रसन्न होते चैतन्यमय होते..!

संत तुकाराम महाराज म्हणतात की, मन करा रे प्रसन्न, सर्व सिद्धीचे कारण...!!

## भारतरत्न पंडित भीमसेन जोशी

**प्रसाद जोग** (मो. : ९४२२०४११५०)

जन्मदिन : ४ फेब्रुवारी,१९२२ नुकतेच त्यांच्या आवडत्या भैरवी बद्दल लिहिलं होत.आज जाणून घेऊया तीर्थ विठ्ठल या अभंगाच्या रेकॉर्डिंगची गोष्ट. कधीकधी अजरामर ठरलेल्या गीतांच्या जन्मकथा आपण जेव्हा ऐकतो तेव्हा अक्षरशः थक्क होऊन जातो. वर्षानुवर्षे रसिकांच्या मनावर अधिराज्य करणाऱ्या या रचना बनवताना काही वेळा खूप काळ निघून जातो, तर काही रचना अगदी क्षणात तयार होतात. पंडित भीमसेन जोशी यांच्या एका अभंगाच्या बाबतीत हा किस्सा तुम्हाला अक्षरशः थक्क करणारा आहे. आकाशवाणीवर 'परंपरा' नावाचा


**JAYANT DESHMUKH**
B.COM., CAIIB DBM

**Dr. AMIT DESHMUKH**
*Assistant Professor* B.Com., MA., Ph.D.

• Authorised Insurance Advisor • Investment Consultant
• Mediclaim • AMFI Registered Mutual Fund Partner

M. : 9930445721 / 9702837022 deshisbijayant@gmail.com

Off. : 106, Shrivatsam, First Avenue Business Park, Durgadi Chowk, Kalyan West - 421201
Resi. : Shree Ram Tower, Near Jain Society, Kalyan (West) 421301

◎ Director - MPFC Udyog Nidhi Ltd., Kalyan
◎ Prudent Partner - Mutual Fund Distributor / Company Deposit / Insurance
◎ Trustee & Treasurer - Balaji Mandir Trust, Kalyan
◎ President - Karnataka Sangha, Kalyan
◎ Past Vice President - Andhra Association, Kalyan
◎ Past Manager - State Bank of India
◎ Housing Loan Provider
◎ Member - BBNG Kalyan
◎ Manager - Laxmi Narayan Vadhu-Var Suchak Kendra, Kalyan
◎ Joint Treasurer - DRBS Kalyan

◎ Certified Astrologer
◎ Meditation
◎ Palmist
◎ Yoga
◎ Numerologist
◎ Vastu
◎ Bhakti Shastri
◎ Cyber Crime Investigator

एक संगीतमय कार्यक्रम होता. एक गायक आपल्या दोन रचना तिथे सादर करत असे. या साप्ताहिक कार्यक्रमात मान्यवर कलावंत हजेरी लावत असत. एकदा पंडित भीमसेन जोशी यांना आकाशवाणीवर या कार्यक्रमासाठी निमंत्रित केले होते. संगीतकार होते पंडित गजेंद्रगडकर आणि संगीतकार राम फाटक. दोन्ही संगीतकारांनी पंडितजींकडून जी गाणी गाऊन घ्यायची होती ती तयार होती. पं. भीमसेन जोशी आकाशवाणीच्या स्टुडिओत आले. संगीतकार राम फाटक यांनी कवी काव्यविहारी यांची एक रचना त्यांच्यासाठी निवडली होती. त्यांच्यासोबत गप्पा चालू असताना त्यांच्या मनात एक वेगळेच नाट्य जन्म घेत होते. त्यांनी ठरवलेले आधीचे गाणे बदलावे असे त्यांना वाटले. ते संगीतकार अरविंद गजेंद्रगडकर यांना म्हणाले आधी तुम्ही तुमचे गाणे करून घ्या, मी आलोच! असे म्हणत ते आकाशवाणीच्या खालच्या मजल्यावरील ग्रंथालयात गेले. खरंतर हा मोठा अवघड असा बाका प्रसंग होता. पं भीमसेन जोशी सारखा महान गायक समोर बसलेला आहे. आपल्या हातात असलेले गाणे आपल्याला बदलायचे आहे. ते गाणे शोधण्यासाठी आपण ग्रंथालयात जात आहोत गाणे कुठून आणणार? काय करणार? पुढच्या दोन तासात हे सर्व उरकायला हवे. पण संगीतकार राम फाटक यांचा मात्र स्वत:पेक्षा जास्त विश्वास भीमसेन जोशींवर होता. संगीतकार राम फाटक ग्रंथालयात आले. त्यांनी तिथे असलेल्या रॅक मधून 'सकल संत गाथा' हे पुस्तक काढले आणि चालू लागले.त्यांचे लक्ष संत नामदेवांच्या एका अभंगा कडे गेले.हा अभंग वाचता वाचताच त्याची चाल त्यांच्या मनात उमटू लागली. जिन्यावरून येताना जवळपास त्यांनी ही चाल पक्की केली. तोवर पंडितजींचे अरविंद गजेंद्रगडकर यांचे गाणे झाले होते. राम फाटक यांनी पंडित भीमसेन जोशी यांना हा अभंग सांगितला आणि गुणगुणून दाखवला. फक्त आठ ओळींचा हा संत नामदेव महाराज यांचा अभंग भीमसेन जोशींना खूप आवडला. ते राम फाटक यांना म्हणाले, राम भाऊ, तुम्ही अप्रतिम चाल बांधली आहे आता मी त्यात कसे रंग भरतो ते बघा. राम फाटक यांनी अल्हैयाबिलावल या रागात या अभंगाची रचना केली. अभंग छोटा असल्यामुळे भीमसेन जोशींच्या आलापाला इथे खूप वाव होता. या आलापमुळे या अभंगात आणखी रंग भरला गेला आणि पुढच्या पंधरा मिनिटांमध्ये त्याची रिहर्सल होऊन तो अभंग रेकॉर्ड देखील झाला. दोन तासापूर्वी कुणाच्या ध्यानीमनी नसलेला हा अभंग पुढच्या दोन तासात रेकॉर्ड देखील झाला. हा अभंग होता 'तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल देव विठ्ठल देवपूजा विठ्ठल'. कमाल म्हटली पाहिजे पं भीमसेन जोशी आणि संगीतकार राम फाटक यांची. पुढे एच एम व्ही ने हाच अभंग त्यांच्या 'अभंगवाणी' या रेकॉर्ड मध्ये समाविष्ट केला. पं भीमसेन जोशी नंतर देशात आणि परदेशात ज्या ज्या मैफीलीत गायले तिथे तिथे हा अभंग गाण्याची रसिक फर्माईश करायचे आणि पंडितजी गाऊ लागले की श्रोतृवृंद डोलायला लागायचा. तीर्थ विठ्ठल । क्षेत्र विठ्ठल ।। देव विठ्ठल । देवपूजा विठ्ठल ।।१।।माता विठ्ठल । पिता विठ्ठल ।। बंधु विठ्ठल । गोत्र विठ्ठल ।।२।। गुरू विठ्ठल । गुरूदेवता विठ्ठल ।। निधान विठ्ठल । निरंतर विठ्ठल ।।३।। नामा म्हणे मज । विठ्ठल सापडला ।। म्हणूनी कळीकाळा । पाड नाही ।।४।। भारतरत्न पंडित भीमसेन जोशी यांना विनम्र अभिवादन .

## अग्नि वायु रविभ्यस्तु त्र्यं ब्रह्म सनातनम । दुदोह यज्ञसिध्यर्थमृगयु: समलक्षणम् ।।

### सौ. कुंदा कुलकर्णी

अर्थ:- परम्यात्माने सृष्टीमध्ये मनुष्याला निर्माण करून चार ऋषींकडून चार वेद ब्रह्माला प्राप्त करून दिले. त्या ब्रह्माने अग्नी, वायू, आदित्य आणि तू म्हणजेच अंगीरा ऋषींकडून चार वेदांचे ज्ञान प्राप्त केले. असे मनुस्मृतीमध्ये लिहिले आहे. म्हणजेच अग्नी, आदित्य, वायू आणि अंगीरा ऋषींकडून ब्रह्माने वेदांचे ज्ञान प्राप्त

केले. ब्रह्मर्षी अंगीरा वैदिक ऋषी होते. त्यांना प्रजापती असेही म्हणतात. त्यांच्या वंशजांना अंगीरस असे म्हणतात. त्यांनी अनेक वैदिक स्तोत्रे आणि मंत्र यांची निर्मिती केली. अथर्ववेदाला अथर्व अंगीरस असेही नाव आहे.त्यांचे अध्यात्मज्ञान दिव्य होते. त्यांच्याकडे योग बल, तपसाधना व मंत्र शक्ती खूप होती. अग्नीचं एक नाव अंगार असे आहे. एकदा अग्नीदेव पाण्यात राहून तपसाधना करत होते. जेव्हा त्यांनी अंगीरा ऋषींना पाहिले, त्यांचे तपोबल पाहिले तेव्हा ते म्हणाले, हे महर्षी, तुम्हीच प्रथम अग्नी आहात. तुमच्या तेजासमोर मी फिका आहे. तेव्हा अंगिरा ऋषींनी अग्नीला देवतांना हविष्य पोहोचवण्याचं मानाचं काम दिलं. तेव्हापासून यज्ञामध्ये अग्नीला आहुती देऊन देवतांना हविष्य प्राप्ती देण्याची प्रथा सुरू झाली. अंगीरा ऋषींनी आपल्या छोट्या आयुष्यात खूप मोठे ज्ञान संपादन केले असे मनुस्मृतीमध्ये लिहिलेले आहे. ते लहान असतानाच मोठे मोठे लोक त्यांच्याकडे येऊन शिक्षण घेत असत. एकदा ते म्हणाले, पुत्र का इति होवाच ज्ञानेन परिगृह्य तान् । ते ऐकून तेथे बसलेल्या अनेक वृद्धांना राग आला. त्यांनी देवांकडे तक्रार केली. तेव्हा देव म्हणाले, अंगिरा योग्य बोलले, कारण

न तेन वृद्धो भवती येनास्य पलीतं शिर: ।
यो वै युवाप्यधीयानस्तं देव: स्थविरं विदु: ।।

अर्थ : डोक्यावरचे सगळे केस पांढरे झाले म्हणजे माणूस वृद्ध होत नाही. तरुण असूनही जो ज्ञानी असतो त्याला वृद्ध म्हणतात. तेव्हा सर्व वृद्धांनी अंगीरा ऋषींचे शिष्यत्व पत्करले.महर्षी भृगु ,अत्री यांच्यासारख्या अनेक ऋषींनी अंगीराजींकडून ज्ञान प्राप्त केले. राजस्थान येथील अजमेर येथे महर्षी अंगिरा आश्रम आहे. महर्षी शौनक यांना त्यांनी परा आणि अपरा या दोन विद्या शिकवल्या. त्यांना स्वरूपा, सैराट, आणि पथ्या अशा तीन पत्नी होत्या. स्वरूपा मरीची ऋषींची कन्या. तिच्यापासून बृहस्पतीचा जन्म झाला. बृहस्पती देवांचे गुरु. त्यांना खूप मुले झाली. सैराट किंवा स्वराट् ही कर्दम ऋषींची कन्या.तिचे पुत्र महर्षी गौतम, प्रबंध, वामदेव उतथ्य आणि उशीर. पथ्या ही मनु ऋषींची कन्या.तिचे पुत्र विष्णू, संवर्त, विचित, अयास्य असीज. महर्षी संवर्त यांनी वेदातील ऋचा रचल्या. त्यांनी अंगीरास्मृती हा ग्रंथ रचला. अंगिरा ऋषींना अनेक मुले झाली. देवांचे शिल्पकार ऋषी विश्वकर्मा हे त्यांचे नातू.

## संलग्न संस्था वृत्त

* **जळगाव :** 'गीता ही ईश्वराची वाङ्‌मयीन मूर्ती आहे. त्याचा अभ्यास केल्याने, पठण केल्याने हा भवसागर पार करणे मुळीच कठीण नाही', असे गंधार कला मंडळाच्या अध्यक्षा विशाखा देशमुख यांनी सांगितले. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळातर्फे सोमवारी भोईटे नगरात गीता जयंतीनिमित्त कार्यक्रम झाला. सुरुवातीला उपस्थित श्रोत्यांनी गीतेच्या ग्रंथाचे पूजन केले. क्षितिजा देशपांडे यांनी असा एकच ग्रंथ आहे की, ज्याची जयंती केली जाते, असे सांगून कुरुक्षेत्राविषयी माहिती दिली. त्यानंतर गीतेच्या अध्यायांचे सामूहिक वाचन करण्यात आले. यावेळी तेजश्री जेऊरकर, विलास देशमुख, प्राची जेऊरकर, उदय खेडकर, यासह अनेक जण उपस्थित होते.

* **कोल्हापूर :** देशस्थ ऋग्वेदी संघाचा पहिला परिचय मेळावा उत्साहाने रविवार दिनांक २३-११-२०२५ रोजी पार पडला. कोल्हापुरातील प्रसिद्ध वकील मा शिवराम जोशी, श्री. मंदार धर्माधिकारी (उ.-), श्री. अनिकेत अष्टेकर यांनी आज सर्वांनी एकत्र येण्यासाठी परिश्रम घेतले. मुंबईहून खास मध्यवर्ती देशस्थ ऋग्वेदीचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी व कार्यवाह श्री. मिलिंद सरदेशमुख यांनी विस्तृत अशी पुढील कामाची

माहिती दिली आणि दोघांचा या क्षेत्रातला गाढा अनुभव आम्हा कोल्हापूरकरांना निश्चितच प्रेरणादायी ठरला. लवकरच पुढील मिटिंग झाल्यावर कामकाजाची माहिती होईल. व प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल. आज बरीच मंडळी आपापल्या क्षेत्रात नावाजलेली व एका ध्येयाने काम करणारी भेटली. नवीन ओळखीही झाल्या. उस्फुर्तपणे श्री. शशिकांत कुलकर्णी यांनी रु ५०००/- ची देणगीही जाहीर केली. सुरुवात चांगली झाली. आपल्या सर्वांच्या सहकार्याने व अजूनही काही बंधू भगिनी यात सामील होऊन कोल्हापूर संघ नक्कीच भरीव कामगिरी करेल यात शंका नाही. भोजन व्यवस्था ही उत्तम होती. हा कार्यक्रम आयोजित करण्यासाठी मध्यवर्ती संस्थेचे पदाधिकारी श्री राम दिगवडेकर यांनी अपार मेहनत घेतली त्यामुळे हा कार्यक्रम यशस्वी झाला.

*** मुलुंड :** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था मुलुंड चा ४८ वा वर्धापन दिन रविवार दिनांक ९-११-२०२५ रोजी सकाळी १० वाजता संस्थेच्या सभागृहात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे नौदल लेफ्टनंट कमांडर श्रीमती राधिका डांगे, विश्वस्त प्रमुख श्री. विजय वडगबाळकर, अध्यक्ष श्री अशोक जहागीरदार, महिला शाखा अध्यक्षा डॉ. सौ. प्रेरणा क्षीरसागर, कार्याध्यक्ष श्री भगवानराव आडगावकर यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून झाली. सौ.अश्विनी राजाज्ञा यांनी स्वागत गीत सादर केले. संस्थेचे कार्यवाह श्री. नितीन देशपांडे यांनी सर्वांचे स्वागत केले. श्री. विजय वडगबाळकर यांनी संस्थेचा इतिहास सांगून संस्थेच्या प्रगतीच्या आलेख कसा उंचावत गेला याबद्दल सांगितले. संस्था करत असलेल्या धार्मिक सामाजिक कार्यक्रम, उपक्रमा बद्दल सगळ्यांना अवगत केले. कार्यवाह श्री नितीन देशपांडे यांनी प्रमुख पाहुणे नौदल ले. कमांडर श्रीमती राधिका डांगे यांच्या परिचय करून दिला. महिला शाखा अध्यक्षा डॉ. सौ प्रेरणा क्षीरसागर यांनी पारंपरिक पद्धतीने ओटी भरुन त्यांचे स्वागत केले. लेफ्टनंट कमांडर राधिका डांगे यांनी प्रबोधन करताना प्रवेश परीक्षा पास होणे म्हणजे फार काही मिळवले असे आर्मीत मानत नाही असे सांगितले. आर्मी,नौदल व हवाई दल यामध्ये परीक्षेनंतर जे प्रशिक्षण असते ते फार खडतर असते त्यामधून जो ताऊन सुलाखून निघतो तोच पुढे यशस्वी ऑफिसर होतो. असे नमूद केले. प्रशिक्षणानंतर असते ते पोस्टिंग-भारतभर कुठेही होऊ शकते. तुम्हाला तुमच्या सहकाऱ्यांकडून ज्या दर्जानुसार काम पूर्ण व्हावे अशी अपेक्षा असते तो दर्जा तुमच्या स्वतःमध्ये असणे आवश्यक आहे असे त्यांचे अनुभवाचे बोल आहेत. राधिकाताई नौदलातील हवामान खात्यात कमांडर या हुद्यावर कार्यरत होत्या. देशाच्या पूर्व भागात काम करत असताना त्यांच्या दिवस पहाटे २.३० ला सुरू व्हायचा त्यानंतर त्यांचे टीमवर्क कसे चालायचे त्याबद्दल माहिती दिली. यानंतर संस्थेतील सदस्य ज्यांनी आयुष्याच्या एक विशिष्ट टप्पा गाठला आहे (६०, ७५ व ८० वर्ष पूर्ण) त्यांच्या रोख रक्कम व पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.सौ. पूजा निमदेव यांनी सभासदांची नावे जाहीर केली. संस्थेतर्फे वर्धापन दिनाचे औचित्य साधत काही पुरस्कार प्रदान करण्यात येतात यावर्षीचे पुरस्कार खालील प्रमाणे- १) निवृत्त प्राथमिक शिक्षिका-सौ अश्विनी खोत २) संस्कृत विषयात प्राविण्य-श्री प्रसाद भिडे ३) समाजातील उत्कृष्ट कार्यकर्ता- श्री उल्हास परांजपे ४) उत्कृष्ट उद्योजक- श्री महेश कोठूरकर ५) संस्थेतील उत्कृष्ट कार्यकर्ता- श्री भगवान आडगावकर सौ.आरती कुलकर्णी यांनी पुरस्कारप्राप्त मान्यवरांच्या परिचय करून दिला. सर्व मान्यवरांना रोख रक्कम, पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. सौ प्रतिमा जोशी यांनी सन्मान पत्राचे लिखाण केले. या वर्धापन दिनाला मध्यवर्ती मंडळाचे कार्यवाह तसेच समाचार पत्राचे संपादक श्री.मिलिंद सरदेशमुख, डोंबिवली शाखेचे श्री. प्रकाश कुलकर्णी, श्री. प्रकाश उपाध्ये, कल्याण शाखेचे श्री विजय चावरे व गिरगाव शाखेच्या सौ. प्राची टिल्लू, सौ. मनीषा कुसुरकर हे प्रतिनिधी आवर्जून उपस्थित होते. त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. संस्थेचे सदस्य श्री प्रभाकर ग्रामोपाध्ये यांनी आपली पत्नी कै. सौ.गीता ग्रामोपाध्ये यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ संस्थेला रु १ लाख देणगी दिली. काही सभासद व संलग्न संस्थेचे प्रतिनिधी यांनी सुद्धा संस्थेला देणग्या दिल्या संस्था सर्वांची आभारी आहे.

श्री. भगवान आडगावकर (कार्याध्यक्ष) यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे कार्यवाह श्री. नितीन देशपांडे यांनी केले. सौ. अश्विनी राजाज्ञा यांनी म्हटलेल्या 'पसायदाना'ने कार्यक्रमाची सांगता झाली तदनंतर सर्वांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला संस्थेचे अध्यक्ष, विश्वस्त मंडळ, कार्यकारी मंडळ व महिला शाखा यांच्या एकजुटीने वर्धापनदिन यशस्वी रित्या संपन्न झाला.

*** नाशिक :** वैद्य एकनाथ कुलकर्णी यांचा व्हियेतनाम मध्ये सन्मान शिव इंटरनॅशनल फ्रॅटर्निटी ऑफ आयुर्वेद आणि योग यांनी आयोजित केलेल्या आणि आयुष मंत्रालय, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक यांनी मान्यता दिलेल्या व्हियेतनाम या देशातील होचिमिन्ह या शहरात दुसऱ्या आंतरराष्ट्रीय आयुर्वेद व योग परिषदेत वैद्य एकनाथ कुलकर्णी यांनी शोधनिबंध सादर केला तसेच या परिषदेच्या दुसऱ्या दिवसाच्या उद्घाटन समारंभात त्यांनी व्याख्यान दिले, ते म्हणाले की आयुर्वेद आणि योग या शास्त्रांच्या प्रचारासाठी कोणत्याही मर्यादा नाहीत. आज जगातील आरोग्य व पर्यावरण विषयक समस्या सोडविण्यासाठी ही शास्त्रे सक्षम आहेत . त्यांचा तात्विक व प्रायोगिक प्रचार ती शास्त्रे समजून घेऊन सर्वांनी केला पाहिजे. परिषदेच्या मुख्य संयोजिका डॉ. शिल्पा स्वार यांनी स्मृतिचिन्ह देऊन वैद्य कुलकर्णी यांचा सत्कार केला. या परिषदेस १० देशातील सुमारे १५० प्रतिनिधी उपस्थित होते. ७० शोधनिबंध सादर झाले व १० व्याख्याने व योगाची प्रात्यक्षिके झाली.

* देशस्थ ऋग्वेदी संस्थेत सालाबादाप्रमाणे याही वर्षी गुरूवार, दि. ०४/१२/२०२५ रोजी दत्तजंयती मोठया उत्साहात साजरी झाली. या निमित्ताने दत्त मंदिरास आकर्षक सजावट करण्यात आली. दुपारी १२ वाजता दत्तजन्म, संस्थेचे विश्वस्त श्री. मोहिनीराज कुलकर्णी यांच्या हस्ते दत्त जन्माच्या अध्यायाच्या वाचनाने करण्यात आला. याप्रसंगी दत्तयाग करण्यात आला. यागाचे पौराहित्य श्री. मनिष पैठणकर गुरूजी व त्यांचे सहकारी यांनी केले. दत्तयागाचे यजमान संस्थेचे विश्वस्त श्री. मोहिनीराज व सौ. मंगला कुलकर्णी होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्री. मुकंद कुलकर्णी, कार्याध्यक्ष श्री. सुहास पाटील, कार्यवाह श्री. मकरंद सुखात्मे, संस्थेचे विश्वस्थ श्री. वसंत यशवंत कुलकर्णी, कार्यकारिणी सदस्य श्री. निषाद दशपुत्रे, श्री. प्रशांत निरंतर, श्री. राजेंद्र गोविंद हातवळणे महिलाशाखा सदस्य सौ. मनिषा सुहास पाटील, श्रीमती अमिता कुलकर्णी यांचेसह, विश्वस्त मंडळ, कार्यकारी मंडळ व महिलाशाखा सदस्य, संस्थेचे माजी कार्यवाह श्री. नरेंद्र कुलर्णी, समर्थ बँकेचे संचालक श्री. मंदार तगारे, संस्थेचे व्यवस्थापक श्री. दीपक जहागीरदार, कर्मचारी सौ. दीप्ती समीर हिंगणे, श्री. दत्तात्रय देवळालकर व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भावपूर्ण श्रद्धांजली

सौ. संगीता शिरीष ओलपाडकर कार्यकारिणी सदस्य देश्स्थ ऋग्वेदी ब्राष्ण मंडळ, वडोदरा यांचे दु:खद निधन.

वडोदरा आकाशवाणी वरून मराठीत कार्यक्रम देणाऱ्या, सामाजिक कार्यकर्त्या सौ. संगीता ताईंच्या निधनाने झालेली पोकळी कधीही भरून येणार नाही. आम्ही आपल्या दु:खात सहभागी आहोत. अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ संस्थेतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.



# जोडीदार निवडा

**वधू पाहिजे ..........................................................................................**

*** तेजस विद्याधर एकबोटे (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १६/०१/१९८५, **जन्म वेळ :** सकाळी ७.०५, **जन्म ठिकाण :** मुंबई, **उंची :** ५.५, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** वाघुल्य, **रास :** विशाखा, **नक्षत्र :** रोहिणी, **नाडी :** अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** बी.ई. पीजीडीबीएमए **नोकरी/ व्यवसाय :** खाजगी, **वार्षिक उत्पन्न :** २६ लाख ५२ हजार, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९८९२६९९२००

*** इंद्रनील रविंद्र धोत्रे (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०६/१०/१९९२, **जन्म वेळ :** सकाळी ९.३४, **जन्म ठिकाण :** डोंबिवली, **उंची :** ५.१०, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** वशिष्ठ, **रास :** मकर, **नक्षत्र :** श्रवण, **नाडी :** अंत्य, **गण :** देव, **शिक्षण :** डिप्लोमा इन मॅकेनिकलए **नोकरी/ व्यवसाय :** खाजगी (तळोजा), **वार्षिक उत्पन्न :** ५ लाख ५० हजार, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९३२३२९८००५/९८२१४२०२७५

*** सुमीत सुरेश देशपांडे (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०३/०१/१९९४, **जन्म वेळ :** रात्री ९.०५, **जन्म ठिकाण :** अचलपूर जि. अमरावती, **उंची :** ६, **रक्तगट :** बी (+), **गोत्र :** वशिष्ठ, **रास :** कन्या, **नक्षत्र :** उत्तरा फाल्गुनी, **नाडी :** आद्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** बी.ई. संगणक अभियंताए **नोकरी/ व्यवसाय :** वरिष्ठ सॉफ्टवेअर अभियंता, आयटीमध्ये ७ वर्षाचा अनुभव, क्वालिटी किओस्क टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लि. नवी मुंबई, **वार्षिक उत्पन्न:** ११ लाख ५० हजार, **अपेक्षा :** इंजिनीयर पदवीधर असावी, आयटीमधील असावी, **संपर्क :** ८९७६१२२४०८/ ८४५४९५४७३५

*** आदित्य विनायक माउस्कर (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १४/०९/१९९५, **जन्म वेळ :** दुपारी १.३०, **जन्म ठिकाण :** विलेपार्ले (मुंबई), **उंची :** ५.११, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** भारव्दाज, **रास :** मेष, **नक्षत्र :** कृतिका, **नाडी :** अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** डिप्लोमा ऑटोमोबाईलए **नोकरी/ व्यवसाय :** खाजगी, **वार्षिक उत्पन्न :** ५ लाख ५० हजार, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९७६९२२०२१३/९९२०३३५१३१

*** सागर सीमा सुहास जोशी (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०७/०१/१९९४, **जन्म वेळ :** रात्री ११.००, **जन्म ठिकाण :** कांदिवली (मुंबई), **उंची :** ५.१०, **रक्तगट :** बी (–), **गोत्र :** अत्रि, **रास :** तुळ, **नक्षत्र :** विशाखा, **नाडी :** अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** बी. ए. (मुंबई युनिव्हर्सिटी), **नोकरी/ व्यवसाय :** ओला चालवतो स्वत:ची गाडी आहे व्यसाय मुंबईत करतो, लाकडी घाना ऑईलचे ट्रेडिंग करतो, **वार्षिक उत्पन्न :** ५लाख, **अपेक्षा :** पदवीधर, नोकरी असावीच असे नाही, मुंबई व उपनगरातील असल्यास प्राधान्य, शाकाहारी असावी, वयातील अंतर ३ ते ५ वर्षे असावे, चष्मा असेल तरी चालेल, **संपर्क :** ९८६९६१०८८०

*** अनिकेत अशोक बागाइतकर (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १६/११/१९९७, **जन्म वेळ :** सकाळी ६.०६, **जन्म ठिकाण :** डोंबिवली, **उंची :** ५.८, **गोत्र :** गार्ग्य, **रास :** वृषभ, **नक्षत्र :** रोहिणी, **नाडी :** अंत्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** एमएस कॉम्प्युटर इंजिनीअरिंगए **नोकरी/ व्यवसाय :** यूएसए, **वार्षिक उत्पन्न :** ७२ हजार डॉलर, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९९६९३१२८३७

*** विराज समीर कुळकर्णी (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २८/१०/१९९९, **जन्म वेळ :** सकाळी ६.५०, **जन्म ठिकाण :** शिरपूर, **उंची :** ६, **रक्तगट :** बी (+), **गोत्र :** कपि, **रास :** वृषभ, **नक्षत्र :** मृग, **नाडी :** मध्य, **गण :** देव, **शिक्षण :** बी टेकए **नोकरी/ व्यवसाय :** एमएनसी कंपनीत सीनियर प्रोडक्ट इंजीनियर, **वार्षिक उत्पन्न :** १० लाख, **अपेक्षा :** अनुरूप, स्वजातीय, नोकरी करणारी अथवा नोकरी कण्यास तयारी असणारी, **संपर्क :** ७४१०७३९०३९

*** केदार श्रीकांत मालेकर (देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०६/०६/१९८२, **जन्म वेळ :** रात्री ७.५५, **जन्म ठिकाण :** भिवंडी, **उंची :** ५.८, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** काश्यप, **रास :** वृश्चिक, **नक्षत्र :** ज्येष्ठा, **नाडी :** आद्य, **गण:**

राक्षस, **शिक्षण :** डिप्लोमा इलेक्ट–ॉनिक एम. सी. ए, **नोकरी/व्यवसाय :** टीसीएस, **वार्षिक उत्पन्न :** २५ लाख, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९३२६०७७०९८/९८९२३७२३३३

* **ईशान अभय मोडक (कोकणस्थ ब्राह्मण), जन्म तारीख :** २९/१२/१९९२, **जन्म वेळ :** रात्री १०.२०, **जन्म ठिकाण :** बदलापुर, **उंची :** ५.१०, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** वसिष्ठ, **रास :** कूंभ, **नक्षत्र :** शततारका, **नाडी :** आद्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** बी.एससी, एम ए **नोकरी/व्यवसाय :** खाजगी, **वार्षिक उत्पन्न :** ६ लाख, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९०८२६५३५०९/८९२८२९१८२६

* **प्रथमेश मिलिंद निरखे (देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २६/१०/१९९२, **जन्म वेळ :** सायंकाळी ६.०६, **जन्म ठिकाण :** मुंबई, **उंची :** ५.११, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** कात्यायनी, **रास :** तुला, **नक्षत्र :** स्वाती, **नाडी :** अंत्य, **गण :** देव, **शिक्षण :** बी. कॉम, एल. एल. एम. (मुंबई युनिवर्सिटी), डिप्लोमा इन सायबर लॉ (सरकारी कायदा महाविद्यालय), **नोकरी/व्यवसाय :** वकीलीचा सराव, **वार्षिक उत्पन्न :** अंदाजे ४ लाख २० हजार, **अपेक्षा :** पोस्ट ग्रेजुएट, मुंबई स्थित, शाकाहारी, निर्व्यसनी, उंची ५.२ पुढे, वय २६ ते ३० वर्षे, नोकरी करणारी, अनुरूप, **संपर्क:** ९८१९३३२८२३/९८३३६६६५६०

* **कौस्तुभ राजेंद्र राजवाडे (कोकणस्थ ब्राह्मण), जन्म तारीख :** ०८/०१/१९९३, **जन्म वेळ :** सकाळी ७.४०, **जन्म ठिकाण :** मुलुंड, **उंची :** ६, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** शांडिल्य, **रास :** मिथुन, **नक्षत्र :** आद्रा, **नाडी :** आद्य, **गण:** मनुष्य, **शिक्षण :** एम.एससी ए **नोकरी/ व्यवसाय :** ॲक्सिस बँक (ऐरोली), **वार्षिक उत्पन्न :** १२ लाख, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९८६७२७२१६४/९८१९२८३४९९

* **प्रसाद शिशिकांत जोशी (कोकणस्थ ब्राह्मण), जन्म तारीख :** २९/१२/१९९३, **जन्म वेळ :** सकाळी १०.२०, **जन्म ठिकाण :** ठाणे, **उंची :** ५.७, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** शांडिल्य, **रास :** मिथुन, **नक्षत्र :** आद्रा, **नाडी :** आद्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** बी. कॉमए **नोकरी/ व्यवसाय :** पिरामल कंपनी, **वार्षिक उत्पन्न :** १० लाख, **अपेक्षा :** कामसू, नोकरी करणारी, सासूला सांभाळणारी, गोरी सडपातळ, **संपर्क :** ८८७९२०२३०९/९८१९३७९३४६

* **पवन श्रीरंग मलागी (कन्नड ब्राह्मण वैष्णव), जन्म तारीख :** १५/०३/१९९४, **जन्म वेळ :** पहाटे ४.३०, **जन्म ठिकाण :** डोंबिवली (महाराष्ट्र), **उंची :** ५.६, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** हरितस्य, **रास :** मीन, **नक्षत्र :** रेवती, **नाडी :** अंत्य, **गण :** देव, **शिक्षण :** बी बी ए. करत आहे, डिप्लोमा इन टूल अँड डाय मेकिंग, डिप्लोमा इन ट्रॅव्हल अँड टुरिझम **नोकरी/व्यवसाय :** सहाय्यक व्यवस्थापक, **वार्षिक उत्पन्न :** १० – ११ लाख आणि इतर सुविधा, **अपेक्षा:** अनुरूप, **संपर्क :** ७४४८२३३८८१/९७६३२४८८५१

* **आदित्य संदीप रानडे (कोकणस्थ ब्राह्मण), जन्म तारीख :** ११/०५/१९९४, **जन्म वेळ :** सकाळी ८.२४, **जन्म ठिकाण :** ठाणे, **उंची :** ५.७, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** भारव्दाज, **रास :** वृषभ, **नक्षत्र :** कृतिका, **नाडी :** आद्य, **गण:** राक्षस, **शिक्षण :** इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशनमध्ये बी.ई., अर्थशास्त्र आणि वित्त विषयात पीजीडीएम, **नोकरी/व्यवसाय :** KPMG मुंबईमध्ये सल्लागार, **वार्षिक उत्पन्न :** १४लाख ५२हजार, **अपेक्षा :** अनुरूप, नोकरी करणारी, **संपर्क :** ९८२०३९०८९६/९९३०६४७०९०

* **कौशिक संजय अष्टेकर (देशस्थ यजूर्वेदि ब्राह्मण), जन्म तारीख :** १७/०८/१९९५, **जन्म वेळ :** रात्री १२ नंतर, **जन्म ठिकाण :** अहमदनगर, **उंची :** ५.८, **रक्तगट :** बी (–), **गोत्र :** कौशिक, **रास :** मेष, **नक्षत्र :** भरणी, **नाडी :** मध्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** बी.ई, **नोकरी/व्यवसाय :** खाजगी, **वार्षिक उत्पन्न :** ६लाख ५०हजार, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९४२२६९०९८०

* **जय शैलेश डोंगरे (कोकणस्थ ब्राह्मण), जन्म तारीख :** १२/०६/१९९७, **जन्म वेळ :** दुपारी १२.३४, **जन्म ठिकाण :** डोंबिवली, **उंची :** ५.१०, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** शांडिल्य, **रास :** सिंह, **नक्षत्र :** पूर्वा फाल्गुनी, **नाडी:**

मध्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** एल. एल. एम., एल. एल. बी., बी. ए. आणि प्रमाणित योग प्रशिक्षकए **नोकरी/ व्यवसाय :** कार्यकारी कायदेशीर अधिकारी म्हणून टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, **वार्षिक उत्पन्न :** १० लाख आणि इतर सुविधा, **अपेक्षा :** ब्राह्मण, पदवीधर, नोकरी अथवा व्यवसाय, **संपर्क :** ९९८७१६८४८६/९८१९८८४८८०

**वर पाहिजे** ..........................................................................................

**※ मनश्री जयप्रकाश शिरगुरकर (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २०/१०/१९९५, **जन्म वेळ :** दुपारी १२.१६, **जन्म ठिकाण :** दहिसर (मुंबई), **उंची :** ५.१, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** काश्यप, **रास :** सिंह, **नक्षत्र :** पूर्वा फाल्गुनी, **नाडी :** मध्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** बी. कॅाम, सीए, **नोकरी/ व्यवसाय :** गोरेगाव (मुंबई), **वार्षिक उत्पन्न:** १३ लाख, **अपेक्षा :** अनुरूप, उच्च शिक्षित, सीए/सीएस/ बी.ई. /बी टेक + एम.बी.ए, सर्विस/ व्यवसाय, मुंबई, हैदराबाद, बंगलोर, पुणे इतर शहर, **संपर्क :** ९३२३६४७८८५/९८६९७३८८५९

**※ ऋचा श्रीराम वाघ (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १३/१२/१९९५, **जन्म वेळ :** दुपारी २.३४, **जन्म ठिकाण :** पुणे, **उंची :** ५.५, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** हरितस, **रास :** सिंह, **नक्षत्र :** मघा, **नाडी :** मध्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** बी. कॅाम, सीए फायनल, **नोकरी/ व्यवसाय :** मुंबई, **वार्षिक उत्पन्न :** ८ लाख ५०हजार, **अपेक्षा:** अनुरूप, मुंबई, पुणे, **संपर्क :** ९८१९५०१९०७

**※ आकांक्षा आशिष गोधमगावंकर (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २५/०८/१९९७, **जन्म वेळ :** सकाळी ८.१५, **जन्म ठिकाण :** नांदेड, **उंची :** ५.३, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** वसिष्ठ, **रास :** वृषभ, **नक्षत्र :** कृत्तिका, **नाडी :** अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** बी.ई., एम.बी.ए, **नोकरी/ व्यवसाय :** खाजगी पुणे, **वार्षिक उत्पन्न :** ९ लाख, **अपेक्षा :** अनुरूप, मुंबई, पुणे, बंगलोर मिळाल्यास उत्तम, **संपर्क :** ९४०४२११०००/८६०५२०८८२७

## (घटस्फोटित / पुर्नविवाह)

**वधू पाहिजे** ..........................................................................................

**※ प्युमोरी आशिष देवस्थळे (कऱ्हाडे ब्राह्मण), जन्म तारीख :** २७/०२/१९९८, **जन्म वेळ :** रात्री १.४५, **जन्म ठिकाण :** लातूर, **उंची :** ५.७, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** वसिष्ठ, **रास :** कूंभ, **नक्षत्र :** शततारका, **नाडी :** आद्य, **गण:** राक्षस, **शिक्षण :** एम.एससी. डेटा सायन्ससह गणितए **नोकरी/ व्यवसाय :** स्वत:चे गणिताचे शिकवणी वर्ग, **अपेक्षा:** नाममात्र घटस्फोटीत, विना अपत्य चालेल, वयातील अंतर १ते ५ वर्ष हवे, **संपर्क :** ९२२५८३३३१०

**(टीप : स्थळांची माहिती पडताळून घेण्याची जबाबदारी मंडळ घेणार नाही, ती तुमची स्वत:ची राहील)**

**जय जय रघुवीर समर्थ**

## नम्र आवाहन : नित्य गोग्रास सेवा




आपल्या श्री समर्थ मठ खातगावमधील गोशाळेत २० देशी खिलार गाई आहेत. सध्या देशीगायींच्या चारापाण्याची समस्या तीव्र आहे. त्यासाठी या देशी खिलार गायींच्या चारापाण्याची कायमस्वरुपी समस्या सोडवण्याचा आपणा सर्वांच्या सहभागाने आणि सहकार्याने एक प्रयत्न करतो आहोत. त्यासाठी आपले आम्हाला सहकार्य हवे आहे.या नित्य गोग्रास सेवेमधे दरमहा १००० किंवा हजार शक्य नसतील तर दरमहा ५०० याप्रमाणे त्रैमासिक, सहामाही किंवा वार्षिक सेवा न्यासाच्या खात्यावर जमा व्हावी ही रक्कम गोसेवा फंडाला जमा होईल त्याची आपणांस रितसर पावती मिळेल. आपली देणगी ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र असेल. शास्त्रात गोग्रासासाठी अतिशय महत्त्वाची असणारी काळी कपिला आणि लाल गाय आपल्या देशी गोपालनात आहेत. कुणावरही सक्ती नाही पण आपण आणि आपले संबंधीत मंडळींनी स्वेच्छेने या नित्य गोग्रास सेवेत अवश्य सहभाग द्यावा ही विनंती. आपल्या सक्रीय सहभागाची अपेक्षा व्यक्त करतो. बँक खात्याचा क्यू आर कोड सोबत देत आहोत.

# सायबर गुन्हेगारी

**कौस्तुभ रायरीकर, पुणे (मो.९७६६४१४३३५)**

आजकाल सगळं काही ऑनलाईन झालं आहे – बिल भरणं, शॉपिंग करणं, बँकिंग, अगदी गप्पाही. जसे वास्तवात चोरट्यांचा आपल्याला धोका असतो, तसाच डिजिटल जगात 'सायबर गुन्हेगारांचा' धोका वाढत आहे. ते आपल्यासारख्याच सामान्य माणसांना लक्ष्य करतात – फोनवर, सोशल मीडियावर, किंवा बँकेच्या नावाने फसवणूक करत. म्हणूनच या लेखात आपण अगदी सोप्या भाषेत समजून घेणार आहोत – सायबर गुन्ह्यांचे प्रकार, आणि आपण स्वतःची सुरक्षितता कशी राखू शकतो. **१. फिशिंग –** विश्वासात घेऊन फसवणूक तुमचं बँक अकाउंट ब्लॉक झालं आहे, कृपया लिंकवर क्लिक करा. – असा मेसेज आला तर सावध व्हा! हे काय असतं? तुमच्याकडून बँक डिटेल्स, पासवर्ड, OTP वगैरे मिळवण्यासाठी बनावट मेल, मेसेज किंवा कॉल केला जातो. सावधगिरी : अनोळखी लिंक्सवर कधीच क्लिक करू नका. बँक कधीही SMS/ईमेलवर OTP मागत नाही. पाठवणाऱ्याचा ईमेल किंवा मोबाईल नंबर नीट तपासा. **२. ऑनलाईन फसवणूक –** फोनवरची चलाखी सर, तुमचं KYC अपडेट करायचं आहे, कार्ड नंबर सांगा ना. हा कॉल आला तर – लक्षात ठेवा, फसवणुकीचा प्रयत्न आहे. काय प्रकार असतात? खोट्या नोकऱ्यांच्या जाहिराती लॉटरी लागली म्हणणारे मेसेज एचख किंवा फायनान्स प्सची स्कीम Paytm/Google Pay लिंकद्वारे पैसे लंपास करणे. सावधगिरी: कोणालाही कार्ड डिटेल्स/OTP सांगू नका. फक्त ऑफिशियल प्स आणि वेबसाईट्स वापरा. आत्ता लगेच निर्णय घ्या अशा ऑफरपासून दूर रहा. **३. ओळख चोरणे –** तुमचं नाव वापरून दुसऱ्याचं काम साध्य केले जाते कोणीतरी तुमचा आधार कार्ड, पॅन कार्ड वापरून तुमच्या नावाने लोन घेतलं तर– कल्पना करा, किती घाबरण्यासारखं आहे. हे काय असतं? तुमची वैयक्तिक माहिती चोरून, ती गैरवापरासाठी वापरणं. सावधगिरी: आधार/पॅन कार्डचे फोटो सोशल मीडियावर टाकू नका. प्रत्येक गोष्टीसाठी वेगळा पासवर्ड ठेवा. Two-factor authentication चालू ठेवा. सायबर बुलिंग आणि ऑनलाइन त्रास – मानसिक छळ विशेषतः तरुण आणि विद्यार्थ्यांना हा त्रास होतो. सोशल मीडियावरून फेक प्रोफाइल, अपमानास्पद कमेंट्स, फोटो शेअर करून धमकावलं जातं. उदाहरण : १. बनावट अकाउंट तयार करून बदनामी करणे. २. व्हॉट्सप ग्रुपवर अपमान होईल असे शब्द वापरणे. ३. खाजगी फोटो/व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देणे सावधगिरी: लगेच ब्लॉक करा आणि रिपोर्ट करा. आई-वडील, शिक्षक किंवा मित्रांशी बोलायला घाबरू नका. cybercrime.gov.in वर ऑनलाइन तक्रार दाखल करता येते. ४. हॅकिंग – डिजिटल घरफोडी तुमचा मोबाईल किंवा लॅपटॉप म्हणजे तुमचं डिजिटल घर. हॅकिंग म्हणजे कोणी तुमच्या परवानगीशिवाय त्यात घुसून सर्व माहिती चोरतो. काय नुकसान होऊ शकतं? सोशल मीडिया अकाउंट ताब्यात घेतले जातात. बँकेतील पैसे गायब होतात, खाजगी फोटो, चॅट्स लीक होतात. सावधगिरी: पब्लिक Wi-Fi वापरताना महत्त्वाचं काम करू नका. अनोळखी फाईल्स, ॲप्स डाउनलोड करू नका. अँटीव्हायरस ठेवा आणि मोबाईल/लॅपटॉपचे सेटिंग अपडेट करत राहा. अश्लील मजकूर आणि सेक्स्टॉर्शन – ऑनलाईन ब्लॅकमेल खोट्या प्रोफाईलमधून ओळख करून मैत्री जमवली जाते, आणि नंतर खाजगी फोटो/व्हिडिओ मागवून ब्लॅकमेल केलं जातं. हे कसं होतं? 'मैत्री'च्या नावाखाली भावनिक गुंतवणूक व्हिडिओ कॉल रेकॉर्डिंग करून पैसे मागणे. सावधगिरी : अनोळखी व्यक्तींशी खाजगी गोष्टी शेअर करू नका. काही झालं तरी गप्प बसू नका – पोलिसांकडे किंवा cybercrime.gov.in वर तक्रार करा कायद्यानं काय होऊ शकते? भारतामध्ये 'माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० (IT Act)' आणि IPC (भारतीय दंड संहिता) अंतर्गत सायबर गुन्ह्यांना शिक्षा आहे. उदाहरणार्थ: ❊ कलम 66C, 66D IT Act: ओळख चोरी, फसवणूक ❊ कलम ६७ : अश्लील मजकूर शेअर करणे ❊ PC कलम 354D : सायबर स्टॉकिंग ❊ PC कलम ५०९ : अपमानास्पद, गलिच्छ भाषेत मेसेज पाठवणे. आजकाल जवळजवळ प्रत्येक जिल्ह्यात सायबर सेल आहेत. तुम्ही cybercrime.gov.in वर तक्रार करू शकता – आपले नाव गुप्त ठेवूनसुद्धा ही तक्रार करता येते. मोलाचा सल्ला: सतर्क राहा आणि घाबरून जाऊ नका. तुम्हाला तंत्रज्ञानाचं शास्त्र माहित नसलं तरी चालेल, पण स्वतःचं डिजिटल संरक्षण करणं शिकायला हवं. अगदी थोडक्यात आठवणीसाठी: ❊ कोणालाही OTP, पासवर्ड देऊ नका ❊ अवघड पासवर्ड वापरा. ❊ शंकास्पद लिंक क्लिक करणे टाळा. ❊ मुलांशी, कुटुंबीयांशी या विषयावर सविस्तर बोला, माहिती घ्या. ❊ काही संशयास्पद वाटलं तर लगेच तक्रार करा. ❊ सायबर गुन्हे कोणावरही होऊ शकतात. आपण जर माहिती आणि काळजी घेतली, तर त्यापासून सुरक्षित राहू शकतो.



IndusInd Bank
THE ULTIMATE SAVINGS ACCOUNT IS HERE
%
Attractive Interest Rates*
on savings account and fixed deposits
My ACCOUNT My NUMBER
Freedom to choose your account number
GET UP TO 20%* OFF
on food & groceries from Swiggy & BigBasket
TICKET
BUY ONE GET ONE FREE
movie ticket on BookMyShow*
Complimentary Airport Lounge Access*
067
Attractive discount on all locker types
Indus Mobile
All-in-one app for banking, shopping, travel, payments and much more
AutoPay
Manage your payments & SIPs using UPI, cards & mobile
*T&C Apply
To know more, please speak to our Customer Service Manager or visit us at www.indusind.com

*With best compliments from*

# SAMARTH
## URBAN CO-OP. CR. SOCIETY LTD.

**HEAD OFFICE:** Samarth Sadan, Gurukrupa Complex, 1st Floor, Maruti Galli, Belgaum. **Ph.: 2431357, 2403968, 4202100**

**RC Nagar Branch:** Bhagirathi, C Scheme, Channama Nagar Main Road, Belgaum. **Ph.: 2443161**

**Tilakwadi Branch:** Samarth Landmark, Opp. Indian Bank, Mangalwar Peth, Tilakwadi, Belgaum. **Ph.: 2430357**

**Shahapur Branch:** 1103, Ground Floor, Bichu Galli, Shahapur, Belgaum. **Ph.: 2431257**

**Khanapur Branch:** 1524/A6, Manerikar Bldg., Belgaum-Goa Road, **Ph.: 6363090655**

### AKSHAY DEPOSIT SCHEME

| | | | |
|---|---|---|---|
| 46 days to 180 days | 6.00% PA | 2 years | 9.00% PA |
| 181 days to 364 days | 6.50% PA | 3 years | 10.00% PA |
| 1 year | 8.00% PA | | |

Senior Citizen 1% extra*

### NIRANTAR

| | |
|---|---|
| 1 year | 8% PA |
| 2 years | 9% PA |
| 3 years | 10% PA |

*T&C Apply



**Adv. Ajay A. Sunalkar**
Chairman



**Rtn. Abhay V. Joshi**
Vice - Chairman

### BOARD OF DIRECTORS

Ganapat A. Kulkarni • Vinayak G. Joshi • Pradeepkumar G. Kulkarni
Arvind S. Kulkarni • Maltesh G. Patil • Sunanda C. Altekar • Chaya N. Joshi
Anil V. Bhandari • Umesh D. Sungar • Parashuram M. Kamble • Ashok H. Pujeri
Raghavendra S. Kesnur - Secretary • Gouri S. Bidi - Gen. Manager

**A LEADING CO-OPERATIVE SOCIETY IN BELGAUM DISTRICT**

anandads

**Samachar Patrika RNI 16775/1967 Regd. No. MCW-126/2024-26,** Published on 15th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.

## मध्यवर्ती मंडळाच्यावतीने कल्याण संस्थेमार्फत विद्यार्थी गुणगौरव



Printed and Published by MILIND MALHARRAO SARDESHMUKH on behalf of AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL,Printed at GURUKRUPA, 03, ROSSARY BUILDING, M M C ROAD, MAHIM (WEST), MUMBAI 400 016 and Published from AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL, LAXMI NARAYAN BAUG, BAL GOVINDAS MARG, MAHIM, MUMBAI 400 016. Editor : MILIND MALHARRAO SARDESHMUKH